**<u>नवी मुंबई महानगरपालिका</u>**

**<u>महापालिका सर्वसाधारण सभा</u>**

महानगरपालिकेच्या गुरुवार, दिनांक 03/03/2016 रोजी भरलेल्या माहे मार्च महिन्याच्या तहकुब सर्वसाधारण सभेत (मुळ सभा 20 जानेवारी 2016) मंजूर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरुपात खालीलप्रमाणे आहे. :-

| | |
|---|---|
| **विषय क्र. 02.**<br>**दिनांक 03 मार्च 2016**<br><br>**निर्णय -** | <br>प्रश्नोत्तरे<br><br>**<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 19.**<br>**दिनांक 03 मार्च 2016**<br><br>**<u>ठराव क्र. 939.</u>**<br>**दिनांक 03 मार्च 2016**<br><br>**निर्णय -** | तुर्भे क्षेपणभुमी येथे नागरी घनकचऱ्यापासून विद्युतनिर्मिती (Wet) करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 13/01/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./26/2016.<br><br>"तुर्भे क्षेपणभुमी येथे नागरी घनकचऱ्यापासून विद्युतनिर्मिती बांधकाम साहित्य टाकाऊ प्रक्रिया करणे व E West प्रक्रिया करणेच्या प्रकल्प उभारणी व राबविणेसाठी येणाऱ्या अंदाजित खर्च रु. 180 कोटी यास प्रस्तावात नमुद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 109, 66अ, व 66 (41अ) अन्वये, शासनाची मजुरी घेण्यास आणि 600 मे. टन प्रतिदिन इतक्या क्षमतेच्या प्रकल्प उभारणी करण्यास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकिय मंजुरी देण्यात यावी."<br><br>**<u>मंजूर</u>** |

महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आणि उचित कार्यवाहीसाठी मा. आयुक्ताकडे पाठविलेल्या सन्मा. नगरसेवकांच्या ठरावांची यादी.

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1. | **श्री. संजू आधार वाडे :-** "प्रभाग क्र. 12 मध्ये से. 2 या ठिकाणी 2 हायमास्टची व्यवस्था करणे. | 20 / जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 2. | **श्री. संजू आधार वाडे :-** "प्रभाग क्र. 12 से. 2 या ठिकाणी प्रतिभा सोसायटी लगतच्या मोकळया भुखंडावर महिलांसाठी महिला उद्योग भवन स्थापन करणे. | 21 / जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 3. | **श्री. संजू आधार वाडे :-** "प्रभाग क्र. 12 से. 2 या ठिकाणी ज्ञानदिप शाळेच्या मागील असलेल्या गार्डन मध्ये पाण्याची कमतरता असल्यामुळे बोरिंगची व्यवस्था करुन पाण्याची स्टोरेज व्यवस्था करुन देणे. | 22 / जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 4. | **सौ. श्रध्दा साजूराम गवस, यांजकडून :-** प्रभाग क्र. 94, सेक्टर 10ए, नेरुळ रेल्वे लाईनच्या रोडला सुलभ शौचालय बांधून देणे. | 23 / जानेवारी | 940 / 03/03/2016 | मंजूर |
| 5. | **श्री. विशाल पोपट ससाणे, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 82 मध्ये जुईनगर रेल्वे पटरी, गावदेवी चौक सेक्टर 24 पेट्रोल पंप जवळ, चिंचोली तलाव सेक्टर 25 सप्तश्रृंगी सोसायटी जवळ व अमृता विदयालयाजवळ चांगल्या प्रतीच्या कमानी बसविणे. | 24 / जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 6. | **श्री. विशाल पोपट ससाणे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 82 मधील गणेश मंदिर रोड सेक्टर 24 सुयोग अपार्टमेंट ते हरी ओम अपार्टमेंट जवळील पदपथाची सुधारणा करणे. | 25 / जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| **7.** | **श्री. विशाल पोपट ससाणे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 82 मध्ये सेक्टर 24 व सेक्टर 25 मध्ये नामनिर्देशन पाटया लावणे. | 26<br>जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **8.** | **श्री. रंगनाथ कारभारी औटी, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 84 सेक्टर 2 व 4 मधील उद्यान व मेन रोड येथे सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविणे. | 27<br>जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **9.** | **श्री. रंगनाथ कारभारी औटी, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 84 मधील सनराईस सोसायटी बाजूला M S E B जागेवर सुसज्य व अत्याधुनिक निवारा शेड बसविणे. | 28<br>जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **10.** | **श्री. रंगनाथ कारभारी औटी, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 84 सेक्टर 2 समोरील S T P प्लान्टची संरक्षण भिंत बसविणे | 29<br>जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **11.** | **श्री. हरिश्चंद्र आत्माराम भोईर, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 59, जुहूगांव -2, सेक्टर 11 वाशी नवी मुंबई येथील गावदेवी मैदान येथील बंद असलेले सुलभ शौचालय तोडून तेथे व्यायामशाळा व वाचनालयासाठी बहूउद्देशीय इमारत बनविणे. | 30<br>जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **12.** | **श्री. हरिश्चंद्र आत्माराम भोईर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 59 जुहूगांव -2, सेक्टर 11 वाशी नवी मुंबई येथील मोडकळीस आलेल्या स्मशानभुमीची दुरुस्ती करणे. | 31<br>जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **13.** | **श्री. हरिश्चंद्र आत्माराम भोईर, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 59 जुहूगाव-2, से. 11 वाशी नवी मुंबई येथील गावदेवी मैदानात बसविण्यात आलेल्या बैठक स्टॅडची दुरुस्ती करुन त्यावर पत्राचे शेड बनविणे. | 32<br>जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 14. | **श्री. काशिनाथ वामन पवार, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 97 मधील सेक्टर 18, 18 अे, 20डी विभाग, 24 मध्ये जेष्ठ नागरिकांना बसण्याकरिता बाकडे बसविणे. | 33<br>जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 15. | **श्री. काशिनाथ वामन पवार, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 97 मधील सेक्टर 18अे, प्लॉट नं. 01 ते तलाव हया पदपथावरील बरीच गटारांची झाकणे नाहीत/खराब झाली आहेत, तरी ती बदलणे. | 34<br>जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 16. | **श्री. काशिनाथ वामन पवार, यांजकडून :-** प्रभाग क्र. 97 मधील सेक्टर 18, मधील अनिरुध्द बापू मैदानात व्यासपीठ उभारणे व दोन छोटया खोल्या बांधण्यात याव्यात जेणेकरुन तेथे सांस्कृतिक कार्यक्रम करता येते. | 35<br>जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 17. | **श्री. विशाल राजन डोळस, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 108 अंतर्गत सेक्टर-48 येथील भूखंड क्रमांक 47 हा स्थानिक महिलांसाठी झुणका भाकर केंद्रासाठी उपलब्ध करुन देणे. | 36<br>जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 18. | **श्री. विशाल राजन डोळस, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 108, सेक्टर-48 नवरत्न हॉटेल समोर साईबाबा मंदिर येथे महानगरपालिकेमार्फत येणाऱ्या सुचना, योजना लोकांपर्यंत पाहोचविण्याकरीता तसेच नवी मुंबईचे अधुनिकरण लक्षात घेता डिजिटल इन्फोरमेशन स्क्रिन बसविण्यात यावी. तसेच जमल्यास नवी मुंबई शहराच्या मोक्याच्या ठिकाणी सुध्दा अशा प्रकारचे नवी मुंबई महानगरपालिकेचे डिजिटल इन्फोरमेशन स्क्रिन बसविणे. | 37<br>जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| **19.** | **श्री. विशाल राजन डोळस, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 108, मधील 90% भाग हा सिडको कन्डोमिनियम अंतर्गत येत आहे. परंतू काही कारणास्तव सिडको कन्डोमिनियम अंतर्गत काम असणाऱ्या गृहनिर्माण संस्थांमध्ये काम करण्यास प्रशासनाने बंदी घातली असल्याकारणाने येथे राहणाऱ्या लोकांना हया अशा सुविधा पुरविता येत नाही. परिणामत: लोकांना बऱ्याचशा सोयी-सुविधांपासून वंचित रहावे लागते. तरी आपण सेक्टर अंतर्गत असणाऱ्या सिडकोनिर्मित संकुलनामध्ये विकास कामे महानगरपालिकेमार्फत करण्याची परवानगी देणे. | 38 / जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **20.** | **श्री. सुनिल बाळाराम पाटील, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 92 दारावे येथील असलेल्या नागेश्वर तलाव मध्ये नेरुळ-दारावे परिसरातील गणपतीचे विसर्जन तसेच दुर्गामातेचे विसर्जन मोठया प्रमाणावर होत असते. त्यामुळे तलावामध्ये मोठया प्रमाणावर गाळ साचल्याने तलावातील पाणी खराब होऊन दुर्गंधी येत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. तरी सदर तलावातील गाळ काढणे तसेच तलावाची डागडूगी करणे. | 39 / जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **21.** | **श्री. सुनिल बाळाराम पाटील, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 92 दारावे सेक्टर 21 येथील भुखंड क्र. 154, 215, 305 येथील पदपथ तयार करणे. | 40 / जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **22.** | **श्री. सुनिल बाळाराम पाटील, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 92 नेरुळ, दारावे सेक्टर 21 येथे असलेल्या संत गाडगेबाबा उदयान (रॉक गार्डन) बाजूस जलकुंभाभोवती संरक्षण भिंत व त्या परिसराचे सुशोभिकरण करणे. | 41 / जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| **23.** | **श्री. चेतन प्रकाश नाईक, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 22 मध्ये अंगणवाडीची इमारत असून त्यामध्ये दोन खोल्या आहेत त्यापैकी एका खोलीचा वापर होत नाही. तरी त्या ठिकाणी नागरी आरोग्य केंद्र सुरु करणे. | 42<br>जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **24.** | **श्री. चेतन प्रकाश नाईक, यांजकडून :-** प्रभाग क्र. 22, दिवा गावातील साईधाम ते वंदना अपार्टमेंट व लगतच्या रस्त्याची सुधारणा करणे. | 43<br>जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **25.** | **श्री. चेतन प्रकाश नाईक, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 22, दिवा तलावालगत असलेल्या मोकळया भुखंडावरर उदयान विकसित करण्यात यावे, जेणेकरुन सदर ठिकाणी डेब्रीज टाकणे बंद होईल. | 44<br>जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 26. | **श्री. विनोद विनायक म्हात्रे, यांजकडून :-**<br><br>प्रभाग क्र. 110 करावेगावाच्या पच्छिमेकडील म्हणजेच टि.एस.चाणक्य ट्रेनिंग सेंटरच्या मागे व पामबिच मार्गालगत असलेली करावेगावातील शेतकऱ्यांची शेतीची अंदाजे 87 एकर जमीन मोकळी पडून आहे. सदर जमिन ही रिजनल पार्क म्हणून आरक्षित व CRZ बाधीत आहे. सिडको प्रशासनाने अनिवासी भारतीय संकुल (NRI COMPLEX) करावेगावाच्या दक्षिण बाजुला खाडीत खारफुटीमध्ये मातीचा भराव करुन अशी स्वतंत्र वसाहत निर्माण केली तसेच भारतीय प्रशासन सेवा मधील अंदाजे 45 आय ए एस व आय पी एस अधिकारी यांच्या गृहनिर्माण सोसायटीला भुखंड देवुन तेथे त्यांनी टोलेजंग इमारत उभारली आहे. त्यावेळेला सिडको प्रशासनाला रिजनल पार्क व कोस्टल झोन CRZ ची परवानगीची आवश्यकता नव्हती का मग स्थानिक प्रकल्पग्रस्तानाच आपल्या स्वत:च्या मालकी हक्काच्या जागेत नविन घर बांधण्यासाठी रिजनल पार्क व कोस्टल झोन CRZ ची परवानगीची जाचक अट का, तरी महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम कलम 37 नुसार कार्यवाही करुन आरक्षण फेरबदलासाठी महाराष्ट्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात यावे तसेच कोस्टल झोन CRZ रदद करण्यासाठी भारत सरकारच्या पर्यावरण मंत्रालयाकडे पाठविणे. | 45<br>जानेवारी | 941<br>03/03/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 27. | **श्री. विनोद विनायक म्हात्रे, यांजकडून :-**<br><br>प्रभाग क्र. 110 करावे पश्चिमेकडील ग्रामस्थांची असलेल्या समुद्रकिनारी जमिनीमध्ये करावे गावातील श्रध्दास्थान असलेले प्राचिन बामणदेव मंदीर असुन त्या ठिकाणी जाण्यायेण्यासाठी सध्या कच्चा रस्ता असुन तो रुंदीकरण तसेच डांबरीकरणाने नविन रस्ता तयार करण्यात यावा व दिवाबत्तीची व्यवस्था करणे. | 46<br>जानेवारी | 942<br>03/03/2016 | मंजूर |
| 28. | **सौ. उषा पुरुषोतम भोईर, यांजकडून :-**<br><br>प्रभाग क्र. 56, कोपरीगाव येथील ॲम्युझमेंट (Amusement Park) पार्क शेजारी असलेले भुखंड क्र. 5 मधील तीन एकर जागा मैदानासाठी (Play Ground) आरक्षित करणे. | 47<br>जानेवारी | 943<br>03/03/2016 | मंजूर |
| 29. | **श्री. जयवंत दत्तात्रेय सुतार, यांजकडून :-**<br><br>प्रभाग क्र. 81, शिरवणे मध्ये एम.आर. एफ. शोरुम पासून जुईनगर रेल्वे स्टेशन पर्यंत मुंबई - पुणे हायवे व शोरुम सर्व्हिस रोड मध्ये मोकळी जागा असून सदर जागेवर डेब्रिज ढिगारे आहेत. सदर ढिगारे हलवून ज्याप्रमाणे डॉ. डि वाय. पाटील स्टेडियम समोर सुशोभिकरण केले आहे, त्याचप्रमाणे सदर मोकळया जागेवर सुशोभिकरण करणे. | 48<br>जानेवारी | 944<br>03/03/2016 | मंजूर |
| 30. | **श्री. जयवंत दत्तात्रेय सुतार, यांजकडून :-**<br><br>नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये नागरिक घराच्या अंतर्गत बांधकाम, फेरफार किंवा घराचे पी.ओ.पी. सुशोभिकरण करत असतात. त्यामधून निघणारे डेब्रिज हे रस्त्यावर टाकत असतात. सदर डेब्रिजमुळे परिसरात अस्वच्छता दिसत आहे. तरी महपालिकेमार्फत डेब्रिज निवारणाकरीता वॉड निहाय नागरिकांकडून किलोप्रमाणे दर आकारुन सदर डेब्रिज हटविणे करीता उपाययोजना करणे. | 49<br>जानेवारी | 945<br>03/03/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 31. | **श्री. जयवंत दत्तात्रेय सुतार, यांजकडून :-**<br>महापालिका क्षेत्रातील मैदाने उच्च न्यायालयाने लग्नासाठी देऊ नये असा निर्णय होऊन राज्य शासनाने नगररचना अधिनियमात तरतूद केली आहे. त्यामुळे गावातील रहिवाशांनी लग्नकार्य कोठे करावे ? हा प्रश्न निर्माण झाला आहे तरी प्रत्येक प्रभाग किंवा गांवातील एक मैदान खेळाच्या मैदाना ऐवजी "प्रदर्शनिय मैदान" म्हणून करावे. जेणेकरुन, रहिवाशांना त्या मैदानाचा वापर लग्न कार्यासाठी करता येईल. | 50<br>जानेवारी | 946<br>03/03/2016 | मंजूर |
| 32. | **सौ. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 83, जुईनगर अंतर्गत जुईपाडागांवाच्या पुर्वापार असलेल्या दोन्ही विहिरींचा गाळ उपसुन त्यांची स्वच्छता करुन जेथे गरज असेल तेथे डागडुजी करुन वर नवीन जाळी बसविणे. | 51<br>जानेवारी | 947<br>03/03/2016 | मंजूर |
| 33. | **सौ. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 83, जुईपाडा गावातील घरांना तसेच ईमारतींना मागेल त्याला पाण्याचे मीटर देण्यात यावेत जेणेकरुन या गोष्टीचा अंमल पुर्ण महापालिका प्रभागात केल्यास पालिकेचे उत्पन्न वाढीस लागेल. | 52<br>जानेवारी | 948<br>03/03/2016 | मंजूर |
| 34. | **सौ. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 83, जुईनगर अंतर्गत मुळगावठाणातील बांधलेल्या नवीन घरांना तीनपट मालमत्ताकर लावला आहे . त्या स्वत:च्या जागा असल्याने तसेच सिडकोचा त्यात हस्तक्षेप नसल्याने तो कमी करुन एकपटच लावणे. | 53<br>जानेवारी | 949<br>03/03/2016 | मंजूर |
| 35. | **सौ. नंदा कुंदन काटे, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 13, ऐरोली येथील सिडको निर्मित जलकुंभास 30 वर्षाहून अधिक काळ झाला आहे. घरांचा वाढता विस्तार लक्षात घेता जलकुंभाची क्षमता अपुरी पडत आहे त्यामुळे या ठिकाणी अधिक क्षमतेचे भुमिगत जलकुंभ बांधण्यात | 54<br>जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| **36.** | **सौ. नंदा कुंदन काटे, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 13, ऐरोली येथील जे विभागातील मुख्य रस्त्यावरील मलनिस:रण वाहिन्य बदलणे. | 55 जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **37.** | **सौ. नंदा कुंदन काटे, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 13, ऐरोली येथे महिला सक्षमिकरण केंद्र बांधणे. | 56 जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **38.** | **सौ. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-** "सिडकोने विकसित केलेल्या घणसोली सेक्टर 1 ते 9 या क्षेत्रातील मालमत्ताधारकांनी मागील 15 वर्षापासून महापालिकेकडे रितसर मालमत्ता कराचा भरणा केलेला आहे व करण्यात येत आहे. असे असूनही महापालिका अधिकारी वर्गाकडून सदरचे क्षेत्र सिडकोकडून महापालिकेस हस्तांतरण झालेले नाही, अशा गैरवाजवी कारणास्तव तेथील रस्ते पदपथ इत्यादी अन्य नागरी सेवा सुविधांची देखभाल दुरुस्ती व उभारणी, पुर्नबांधणी पुर्नउभारणी करण्याचे नाकारुन महानगरपालिकेची शहर पालकत्वाची उत्तरदायीत्व जबाबदारी टाळली जात आहे. त्यामुळे घणसोलीतील जनता नागरी समस्यांनी त्रस्त झाली असून नागरी सेवा सुविधा मिळविण्याच्य मुलभूत अधिकारापासून वंचित राहत असल्याने, सदरचे क्षेत्र महापालिकेने सिडकोकडून हस्तांतरीत करुन घेण्याची कार्यवाही पुर्तता करण्यात यावी | 57 जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **39.** | **सौ. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-** "घणसोली विभागात बहूसंख्य जनता मध्यमवर्गीय असून येथील जनतेस सदयस्थितीत सर्वत्र वाढलेल्या आरोग्य विषयक समस्यांवर मोठया खर्चिक खाजगी वैदयकीय सेवा घेणे भाग पडत आहे. त्यामुळे महापालिकेने घणसोली विभागात सिडकोकडून आरोग्य केंद्रासाठी हस्तांतरीत करुन घेतलेल्या भूखंडावर प्राधान्याने अदयावत साधन सामुग्रीसह आरोग्य केंद्राची उभारणी करणे. | 58 जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 40. | **सौ. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-** "घणसोलीतील सेक्टर 1 ते 9 या सिडको विकासित विभागातील पावसाळी गटारे व मलनि:स्सारण सांडपाणी व्यवस्था यंत्राणेची झालेली असल्याने वाढलेल्या लोकसंखेच्य तुलनेत सदरची यंत्रणा अपुरी तोकडी पडत आहे. त्यामुळे मनपाकडून तातडीने घणसोलीतील सेक्टर 1 ते 9 या क्षेत्रातील पावसाळी गटारे व मलनि:स्सारण सांडपाणी व्यवस्थेची दुरुस्ती तसेच आवश्यक ठिकाणी पुर्नबांधणी पुर्ननिर्मिती पुर्नउभारणी करण्याची कार्यपुर्तता करण्यात | 59<br>जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 41. | **सौ, मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 28, घणसोली येथे जेष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र बांधणे. | 60<br>जानेवारी | 950<br>03/03/2016 | मंजूर |
| 42. | **सौ, मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 28, अंतर्गत अदययावत असे वाचनालय बांधणे. | 61<br>जानेवारी | 951<br>03/03/2016 | मंजूर |
| 43. | **सौ, मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 28, मध्ये दत्तनगर येथे लहान मुलांकरिता बालवाडी सुरु करणे. | 62<br>जानेवारी | 952<br>03/03/2016 | मंजूर |
| 44. | **श्री. लक्ष्मीकांत नामदेव पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 27, अंतर्गत परिसरातील तरुणांना व्यायामाची आवड निर्माण होण्यासाठी व शरीर निरोगी राहण्यासाठी व्यायामशाळा सुरु करणे. | 63<br>जानेवारी | 953<br>03/03/2016 | मंजूर |
| 45. | **श्री. लक्ष्मीकांत नामदेव पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 27, विदयार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी आणि त्यांच्या ज्ञानामध्ये वाढ होण्यासाठी अदयावत असे वाचनालय सुरु करणे. | 64<br>जानेवारी | 954<br>03/03/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 46. | **श्री. लक्ष्मीकांत नामदेव पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 27, अंतर्गत संपुर्ण प्रभागामध्ये असलेल्या मलनि:स्सारण वाहिन्या या अपुऱ्या पडत आहेत. त्यामुळे वारंवार चोकअप होणे असे प्रकार होत आहेत. या करीता सदयस्थितीतील लोकसंख्येच्या मानाने मोठया व्यासाच्या मलनि:स्सारण वाहिन्या टाकणे. | 65<br>जानेवारी | 955<br>03/03/2016 | मंजूर |
| 47. | **सौ. शशिकला अनंत सुतार, यांजकडून :-** प्रभाग क्र. 10, ऐरोली नाका येथील गणपती तलावाचे डिसेल्टींग करुन सुशोभिकरण करणे. | 66<br>जानेवारी | 956<br>03/03/2016 | मंजूर |
| 48. | **सौ. शशिकला अनंत सुतार, यांजकडून :-** प्रभाग क्र. 10, ऐरोली, भुखंड क्रमांक 51, 52/4 सेक्टर 20बी पर्यंत गटाराची सुधारणा करणे. | 67<br>जानेवारी | 957<br>03/03/2016 | मंजूर |
| 49. | **सौ. शशिकला अनंत सुतार, यांजकडून :-** प्रभाग क्र. 10, सेक्टर 20बी ऐरोली येथील साईधाम सोसायटी ते मातोश्री सोसायटी पर्यंत गटाराची सुधारणा करणे. | 68<br>जानेवारी | 958<br>03/03/2016 | मंजूर |
| 50. | **श्री. अशोक बाबुराव गुरखे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 102, सेक्टर नं. 9 येथील मुख्य नाला तुटलेला असुन पावसाळयात पाणी निचरा होण्यास अडथळा निर्माण होत आहे. बऱ्याच ठिकाणी बांधकाम ढासळलेले आहे. सदर नाला दुरुस्त करणे. | 69<br>जानेवारी | 959<br>03/03/2016 | मंजूर |
| 51. | **श्री. अशोक बाबुराव गुरखे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 102, सेक्टर नं. 1 पासुन सेक्टर नं. 9 कडे जाण्याऱ्या रस्त्याच्या बाजूस असलेले गार्ड पटयाची भिंत तुटलेली आहे. ती दुरुस्त करणे. | 70<br>जानेवारी | 960<br>03/03/2016 | मंजूर |
| 52. | **श्री. अशोक बाबुराव गुरखे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 102, सेक्टर नं. 9 येथील गावस्कर मैदानाची दुरुस्ती करुन सुशोभिकरण करणे. | 71<br>जानेवारी | 961<br>03/03/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 53. | **श्री. रमेश चंद्रकांत डोळे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 26, महापे मधील अडवली भुतावळी, संभाजीनगर, सुलाई देवी येथे महानगरपालिकेच्या वतीने बंद बोअरवेल चालू करण्यात यावे व त्यास विद्युत पंप बसवून पाणी साठविण्याकरीता 2000 लि. ची पाण्याची टाकी लवकरात लवकर बसविण्यात यावी. तसेच अडवली भुतावळी व महापे गांव येथील बावडी (विहीर) मध्ये गाळ व कचरा मोठया प्रमाणात साचला आहे. तरी विहीरीतील गाळ व कचरा काढून विहीरीतील पाणी स्वच्छ करण्यात यावे. जेणेकरुन पाणी कपातीमुळे नागरिकांना होणारा त्रास काही प्रमाणात कमी होईल. | 72<br>जानेवारी | 962<br>03/03/2016 | मंजूर |
| 54. | **श्री. रमेश चंद्रकांत डोळे, यांजकडून :-** महापे शिळफाटा मार्गावरील हनुमान नगर ते महापे गावाजवळील उडडाणपुलाखाली जी मोकळी जागा आहे तेथे गार्डन व सुशोभित करण्यात यावे तसेच नागरिकांना तिथे बसण्यासाठी बाक (बँचेस) बसविण्यात यावे. त्यामुळे तिथे कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण होणर नाही. | 73<br>जानेवारी | 963<br>03/03/2016 | मंजूर |
| 55. | **श्रीम. ऋचा रामचंद्र पाटील, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 79, सानपाडा, भुखंड क्र. 41, सेक्टर 10, हा भुखंड उदयान या प्रयोजनासाठी क्षेत्रफळ अंदाजे 11212.21 चौ.मी दिनांक 30/11/2007 रोजी 60 वर्षाच्या कालावधीसाठी महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेला आहे. तरी तेथे नाविन्यपुर्ण उदयान उभारणे. | 74<br>जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 56. | **श्रीम. ऋचा रामचंद्र पाटील, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 79, सानपाडा, भुखंड क्र. 3, सेक्टर 9, झाशीची राणी मैदान (क्षेत्रफळ अंदाजे 14000.00 चौ.मी) येथे अदयावत क्रिडा प्रशिक्षण केंद्र उभारणे. | 75<br>जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 57. | **श्रीम. ऋचा रामचंद्र पाटील, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 79, भुखंड क्र. 1, सेक्टर 8, सानपाडा, हा भुखंड क्षेत्रफळ अंदाजे 6241.24 चौ.मी दिनांक 30/11/2007 रोजी उदयान या प्रयोजनासाठी महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेला आहे. तेथे नाना-नानी पार्क उभारणे | 76<br>जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 58.. | **सौ, मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 48, पावणेगाव येथील प्राथमिक शाळेच्या आवारातील मैदान विकसीत करणे. प्राथमिक शाळेच्या मागील बाजूस झाडे लावून बगीचा तयार करणे व शिशुवर्गासाठी खेळणी बसविणे. | 77<br>जानेवारी | 964<br>03/03/2016 | मंजूर |
| 59.. | **सौ, मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 48, श्रमिकनगर, खैरणे येथील प्राथमिक शाळेच्या आवारातील मैदान विकसीत करणे व शिशुवर्गासाठी खेळणी बसविणे. | 78<br>जानेवारी | 965<br>03/03/2016 | मंजूर |
| 60. | **सौ, मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 48, पावणेगाव येथे जेष्ठ नागरिकांसाठी पावणे बगीच्या येथे विरंगुळा केंद्र बांधणे. | 79<br>जानेवारी | 966<br>03/03/2016 | मंजूर |
| 61. | **श्री, मनोज गोपीनाथ हळदणकर, यांजकडून :-** "नवी मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रात साफसफाईचे काम दिवसा न करता फक्त रात्रीच्या वेळी करण्यात यावे जेणेकरुन रात्रीच्या वेळी साफसफाई केल्याने धुळीचा त्रास होत नाही व साफसफाई योग्यरित्या करणे. | 80<br>जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 62. | **श्री, मनोज गोपीनाथ हळदणकर, यांजकडून :-** "नवी मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रात पाळीव प्राणी मृत झाल्यास त्यांना दफन करण्याकरीता किंवा विल्हेवाट लावण्याची कोणतीही उपाययोजना नाही याकरीता नवी मुंबई महानगरपालिकेने अशा मृत पाळीव प्राण्यांच्या शवाची योग्य विल्हेवाट लावण्याकरीता दफनभुमीची व्यवस्था करणे. | 81<br>जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 63. | **सौ, उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 01, ईश्वरनगर येथे संपुर्ण प्रभागात उद्यान नसल्याने नागरिकांची गैरसोय होत असुन मन्नुभाई चाळ समोरील मैदान गट क्र. 25 दिघा गाव हा M I D C चा भुखंड उपलब्ध असून सदर भुखंडावर उद्यान व जाँगीग ट्रॅक बसविणे. | 82<br>जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 64. | **सौ, उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 01, ईश्वरनगर, बालीनगर येथे ओमकार चाळ ते श्री स्वामी समर्थ चाळीतील गटाराची दुरावस्था झाली असुन सदर ठिकाणी हेवीडयुटी गटार बांधणे. | 83<br>जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 65. | **सौ, उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 01, ईश्वरनगर येथे गुरुकृपा सोसायटी, दुर्गामाता प्लाझा ते उत्तर भारतीय चाळ मुख्य रस्त्यापर्यंत हेवीडयुटी गटार बांधण्यात | 84<br>जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 66. | **सौ, रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-** प्रभाग क्र. 96, सेक्टर 16ए मधील अंतर्गत गटारे सिडकोने गेली 25 वर्षापूर्वी बांधलेले असनू त्यांची अवस्था खुप दयनीय झाली असून व मोडकळीस आले आहेत. तरी सर्व्हे करुन नव्याने हेवी डयुटी गटार बांधणे. | 85<br>जानेवारी | 967<br>03/03/2016 | मंजूर |
| 67. | **सौ, रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-** प्रभाग क्र. 96, सेक्टर 16ए, भुखंड क्र. 31 ते सीसीली सोसायटी पर्यंतच्या रस्त्याची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. ठिक ठिकाणी खडडे पडलेले आहेत. त्या रस्त्यावर अपघात होण्याची शक्यता आहे. तरी सदर रस्त्याचे डांबरीकरण लवकरात लवकर करणे. | 86<br>जानेवारी | 968<br>03/03/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 68. | **सौ, रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-** प्रभाग क्र. 96, सेक्टर 16ए, नवी मुंबई महानगरपालिका शाळा व साई सिध्दी मार्केट लगतच्या संरक्षक भिंतीची पडझड झाली आहे. पडझड झालेली भिंत कोसळून जिवीत हानी होण्याची शक्यता आहे. म्हणून त्या ठिकाणी नवीन संरक्षक भिंत बांधणे. | 87<br>जानेवारी | 969<br>03/03/2016 | मंजूर |
| 69. | **सौ, सुनिता रतन मांडवे, यांजकडून :-** "महापालिकेने 1996 ते 1998 या कालावधीत शहरातील पदपथावर उभारलेल्या रस्त्यांच्या नावांचे लाखंडी खाबांवरील भगव्या रंगातील फलक आजही सुस्थितीत आहेत, असे असूनही त्यानंतरच्या कालावधीत मनपाने रस्त्यांचे नामफलक उभारण्यात विषयीच्या सर्वसाधारण संकेताना व मार्गदर्शक तत्वांना दुलर्क्षत अनाकलनीय व गैरवाजवी पध्दतीने पदपथांवर ग्रेनाईटवर रस्त्यांचा नामोल्लेख करुन दगड विटांचा वापराने केवळ 4 फुट उंचीच्या बांधलेल्या चौथरे उभारलेले आहेत, परंतू अशा चुकीच्या पध्दतीने रस्ता नामफलकांची उभारणी केल्यामुळे आणि रहदारीमुळे वाहन चालक व सर्वसामान्य पादचाऱ्यांना कमी उंचीच्या चौथऱ्यावरील रस्त्याचे नाव नजरेत येत नसल्याने मार्ग शोधण्यात अडचणी उदभवत असून मनपाच्या रस्त्याचे नाम फलक उभारण्याच्या हेतू असफल ठरतो आहे. याकरिता शहरातील सर्व रस्त्यांचे नामफलक हे मजबूत लोखंडी खांबांचा वापर करुन वाहन चालकांच्या व पादचाऱ्यांच्या सहजपणे दृष्टीस येतील अशा उंचीवर योग्य पध्दतीने फलक लावणे. | 88<br>जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 70. | **सौ. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 45, कोपरखैरणे, सेक्टर 6 मधील नवी मुंबई संपुर्ण मुख्य गटारांची दुरुस्ती करणे. | 89<br>जानेवारी | 970<br>03/03/2016 | मंजूर |
| 71. | **सौ. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 45, कोपरखैरणे मधील बस डेपो सुशोभिकरण करणे. | 90<br>जानेवारी | 971<br>03/03/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 3. | **सौ. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 45, कोपरखैरणे, सेक्टर 7 मधील सर्व चौकांचे तसेच मलनि:स्सारण वाहीन्या दुरुस्ती करणे. | 91 / जानेवारी | 972 / 03/03/2016 | मंजूर |
| 72. | **सौ. सायली नारायण शिंदे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 37, मधील रोडलगत येणाऱ्या संपुर्ण चौकांचे सुशोभिकरण करणे. | 92 / जानेवारी | 973 / 03/03/2016 | मंजूर |
| 73. | **सौ. सायली नारायण शिंदे, यांजकडून :-** कोपरखैरणे व घणसोली यांच्या मधोमध येणाऱ्या कोपरखैरणे-घणसोली उडडाणफुलाखाली काँक्रिटीकरण व ग्रील कंपाऊड करणे. | 93 / जानेवारी | 974 / 03/03/2016 | मंजूर |
| 74. | **सौ. सायली नारायण शिंदे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 37, हा भौगोलिक दृष्टया बऱ्याच मोठा आहे. यामध्ये से. 1, 4, 1A, 2A तसेच टिंबर मार्केट चा समावेश होतो. त्यामुळे सध्या प्रभागात कार्यरत असलेली सफाई कामगारांची संख्या हि कमी पडत आहे. त्यामुळे प्रभाग क्र. 37 साठी लवकरात लवकर सफाई कामगारांची संख्या वाढविणे. | 94 / जानेवारी | 975 / 03/03/2016 | मंजूर |
| 75. | **सौ. सिमा चिंतामण गायकवाड, यांजकडून :-** प्रभाग क्र. 31, घणसोली मध्ये गुणाली तलावाचे नव्याने नुतनीकरण करणे तसेच नविन विजेचे पोल बसविणे. | 95 / जानेवारी | 976 / 03/03/2016 | मंजूर |
| 76. | **सौ. लता भालचंद्र मढवी, यांजकडून :-** प्रभाग क्र. 47, मधील कै. अण्णासाहेब पाटील उद्यान सुशोभिकरण करणे. | 96 / जानेवारी | 977 / 03/03/2016 | मंजूर |
| 77. | **सौ. लता भालचंद्र मढवी, यांजकडून :-** प्रभाग क्र. 47, मधील सर्व स्ट्रीट लाईट पोल बदलणे. | 97 / जानेवारी | 978 / 03/03/2016 | मंजूर |
| 78. | **सौ. लता भालचंद्र मढवी, यांजकडून :-** प्रभाग क्र. 47, मधील मलनि:स्सारण वाहिन्या बदलणे. | 98 / जानेवारी | 979 / 03/03/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 79. | **श्री. बहादुर त्रिलोकसिंह बिस्ट, यांजकडून :-** नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात झोपडपटटी प्रभागात पाणी टंचाई लक्षात घेता झोपडपटटी प्रभागात शक्य होईल त्या ठिकाणी बोरिंग करुन बोरवेल, हॅण्डपंप ची व्यवस्था करावी. तसेच जूने नवी मुंबई महानगरपालिकेचे नादुरुस्त हॅण्डपंप दुरुस्त करुन कार्यरत करणे. | 99<br>जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 80. | **श्री. बहादुर त्रिलोकसिंह बिस्ट, यांजकडून :-** "नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात उपलब्ध विहिर झोपडपटटी भागाकरिता एक वरदान आहे परंतू विहिरीचे पाणी दुषित असल्याकारणाने वापरत नाही. पाण्याची उपसा करुन चागल पाणी नागरिकांना उपलब्ध करुन देणे. | 100<br>जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 81. | **श्री. बहादुर त्रिलोकसिंह बिस्ट, यांजकडून :-** "नवी मुंबई महानगरपालिका झोपडपटटी क्षेत्रात ठिकठिकाणी 10,000 लि. पाण्याच्या टाकीची व्यवस्था करुन त्या टाकीला पाणी पुरवठा करण्याकरिता बोरवेलची व्यवस्था बोरिंग करुन करणे. | 101<br>जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 82. | **सौ. सुरेखा अशोक नरबागे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 103, सीबीडी बेलापूर, से. 8 मधील आर्टीस व्हीलेजच्या मागील बाजूस उभारलेल्या पुर नियंत्रण बंधाऱ्याची दुरुस्ती करुन त्या बंधाऱ्याच्या आसपासच्या परिसराचे पर्यटन स्थळाच्या स्वरुपात सुशोभिकरण करुन त्या ठिकाणास पर्यटन स्थळ म्हणून घोषित करणे. | 102<br>जानेवारी | 980<br>03/03/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 83. | **सौ. सुरेखा अशोक नरबागे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 103, मधील माता रमाबाई आंबेडकर नगर, छत्रपती संभाजी नगर आणि दुर्गामाता नगर या 9 हजारपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या बेठया घरांच्या स्वरुपात असलेल्या नागरी वसाहतीस हागणदारी मुक्त करण्यासाठी लोकसंख्येच्या तुलनात्मक दृष्टया अभ्यास करुन पुरेशा संख्येच्या शौचालयांची उभारणी करणेसह ती शौचालये मलनि:स्सारण वाहिन्यांना जोडणे. | 103<br>जानेवारी | 981<br>03/03/2016 | मंजूर |
| 84. | **सौ. सुरेखा अशोक नरबागे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 103, से. 8 मधील आर्टीस व्हीलेजच्या दोन्ही बाजूकडील म्हणजेच से. 8 ए आणि से. 8 ब या सेक्टरमधील दगडी बांधकामाच्या गटाराची व त्यावरील पदपथांची दुराव्यस्था झाल्याने तसेच वेळोवेळीच्या डांबरीकरणाने रस्ता व पदपथांमधील उंचीचा फरक 2 ते 3 इंच इतका कमी राहिल्याने वाहने थेट पदपथांवर चढून नागरिकांच्या जिवितास धोका उत्पन्न होणारी परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे या पदपथांची योग्य पध्दतीने पुर्नबांधणी करणे. | 104<br>जानेवारी | 982<br>03/03/2016 | मंजूर |
| 85. | **श्री. निवृत्ती शंकर जगताप, यांजकडून :-** गवळीदेव घणसोली हे नवी मुंबईतील डोंगरभागातील पर्यटन स्थळ आहे. पावसाळा सुरु झाल्यावर या ठिकाणी पाण्याचा साठा मोठया प्रमाणात होत असतो व या ठिकाणी धबधब्याच्या रुपाने पाणी वाहून जात असते. त्यामुळे पर्यटकांचे हे आवडते ठिकाण आहे. या ठिकाणी पावसाळयात साठणारे पाणी अडविण्यासाठी तीन बंधारे बांधले तर मोठया प्रमाणात पाणी अडविले जावू शकते, व या ठिकाणी अडविलेल्या पाण्याचा वापर नवी मुंबई महानगरपालिका नागरिकांना पाणी पुरवठा करण्यासाठी करु शकते. तरी या ठिकाणी बंधारे बांधण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून योग्य ती कायदेशिर कार्यवाही करुन या ठिकाणी बंधारे बांधणे. | 105<br>जानेवारी | 983<br>03/03/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| **86.** | **श्री. निवृत्ती शंकर जगताप, यांजकडून :-** प्रभाग क्र. 29, घणसोली-2 या प्रभागातील तीन बावडी म्हात्रे आळी, जयश्री नगर, काफरीबाबा नगर, करंजाई मंदिर, या नगरांत पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे. | 106<br>जानेवारी | 984<br>03/03/2016 | मंजूर |
| **87.** | **श्रीम. शुभांगी ज्ञानेश्वर पाटील, यांजकडून :-** "नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिसरातील जनतेला भरमसाठ प्रॉपर्टी टॅक्स येत आहे. त्यामुळे येथील नागरीक ते भरत नाहीत. महानगरपालिका मुळ रक्कमेवर व्याज/दंडव्याज आकारते परिणामी येथील नागरीक प्रॉपर्टी टॅक्स भरत नाहीत. त्यामुळे मार्च 2016 पर्यंत नागरीकांना लावण्यात येणारे व्याज/दंडव्याज माफ करणे. | 107<br>जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **88.** | **श्रीम. शुभांगी ज्ञानेश्वर पाटील, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 67, नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिसरातील तुर्भे, ओ/1, से-21, फेज-2 मध्ये नवी मुंबई महापालिकेच्या वतीने "सांस्कृतिक भवन" बनविणे. | 108<br>जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **89.** | **श्री. गिरिश कान्हा म्हात्रे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 95, मध्ये खालीची आळी नेरुळ गांव येथे पदपथाची व गटारांची सुधारणा करणे. | 109<br>जानेवारी | 985<br>03/03/2016 | मंजूर |
| **90.** | **श्री. गिरिश कान्हा म्हात्रे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 95, मध्ये हनुमान मंदिरापासून ते गोपीनाथ पाटील यांच्या घरापर्यंत पदपथांची व गटारांची सुधारणा करणे. | 110<br>जानेवारी | 986<br>03/03/2016 | मंजूर |
| **91.** | **सौ. दिव्या वैभव गायकवाड, यांजकडून :-** प्रभाग क्र. 64, अंतर्गत वाशी, से. 6, एफ टाईप मार्केट ते U रो हाऊस पर्यंत फुटपाथची रुंदी कमी करण्यात यावी व नवीन फुटपाथ बांधून रस्त्याचे रुंदीकरण करणे. | 111<br>जानेवारी | 987<br>03/03/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| **92.** | **सौ. दिव्या वैभव गायकवाड, यांजकडून :-** प्रभाग क्र. 64, अंतर्गत वाशी, से. 7, जनता मार्केटच्या लगतच्या मुख्य पावसाळी गटार मोडकळीस असलेले असहे. सायन-पनवेल हायवे वरुन येणारे पावसाळयाचे पाणी या गटाराच्या माध्यमातून होल्डींग पॉडपर्यत जाते. तरी हे गटार पुर्ण जमिनदोस्त झालेले आहे व कायमस्वरुपी पावसाळयात येथे पाणी तुबूंन राहते, तरी से.7 जतना मार्केट ते एमटीएनएल पर्यत नवीन आर.सी.सी. गटार बांधणे. | 112<br>जानेवारी | 988<br>03/03/2016 | मंजूर |
| **93.** | **सौ. दिव्या वैभव गायकवाड, यांजकडून :-** प्रभाग क्र. 64, अंतर्गत से. 6, ते वाशीगांव ला जाणाऱ्या नवीन सबवेची अवस्था अतिशय दयनिय झालेली आहे. जागोजागी खडडे पडलेले आहेत. तरी आज सबवे सुनियोजित प्रमाणे बांधण्यात यावा व नवीन रस्ते बांधणे. | 113<br>जानेवारी | 989<br>03/03/2016 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **94.** | **श्री. रविंद्र उध्दव इथापे, यांजकडून :-**<br>"नवी मुंबई महानगरपालिकेची स्थापना नगर विकास विभाग महाराष्ट्र राज्य यांनी दि.17/12/1991 रोजी घोषीत केलेल्या अधिसुचने नुसार, ठाणे तालुक्यातील 28 ग्रामपंचायतीच्या अधिपत्याखालील भाग, सिडकोने विकसीत केलेले 05 नोड व महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने विकसीत केलेल्या औद्योगिक वसाहतीचा 162.5 चौ.कि.मी. क्षेत्राचा समावेश करुन, करण्यात आली व पुढे अधिसुचना दि.08/06/2007 अन्वये नमुंमपा कार्यक्षेत्रातील 14 गावे वगळुन नमुंमपाचे कार्यक्षेत्र 108 चौ.कि.मी. घोषित केले आहे. नवी मुंबई महानगरपालिकेची निर्मिती (सन 1992 साली ) होत असतांना, महानगरपालिकेपूर्वी सिडको (सन 1971 ) व एम.आय.डी.सी.(सन 1960) ची स्थापना झालेली आहे. आणि नवी मुंबई क्षेत्रातील सर्व जागा महापालिका स्थापन होणपेपुर्वीच शासनाकडून अधिग्रहित करुन सिडको व एम.आय.डी.सी. ला हस्तांतरीत झालेल्या आहेत. त्यामुळे महापालिकेकडे स्वत:च्या मालकीच्या जागा नाही. सबब, नागरी सुविधांच्या भूखंडासाठी सिडको व एम.आय.डी.सी. कडे मागणी करावी लागते. सन 1991 मध्ये या शहराची लोकसंख्या 3 लक्ष 18 हजार व 2001 मध्ये 7.03 लक्ष तर सन 2011 मध्ये 11.19 लक्ष इतकी वाढ झालेली आहे. त्यामुळे झपाटयाने विकसीत होणा-या या शहरातील नागरिकांना, नागरी सुविधा देणेकरीता महापालिकेला वेळोवेळी सिडको व एम.आय.डी.सी. तसेच राज्य शासन व केंद्र शासनाकडे भुखंडाची मागणी करावी लागते आणि उक्त प्राधिकरणाकडून वेळोवेळी प्राप्त होणारे भुखंड हे 30,60 व 99 वर्षाच्या भाडे करारावर दिले जातात. परिणामी जनतेच्या करातुन सदरिल भुखंडावर उद्याने, खेळाचे मैदाने, शाळा, रुग्णलये, रस्ते, गटारे व अन्य लोकोपयोगी कामे करुन, सुध्दा उपरोक्त भुखंड भाडेकरारावर असल्यामुळे असल्यामुळे भाडेकराराचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर उपरोक्त भुखंडाचे मालकी हक्क मुळ प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करणेची वेळ भविष्यात येऊ शकते. त्यामुळे जनतेच्या कराच्या उत्पनातून निर्माण केलेल्या नागरी सेवांपासून जनतेस वंचित रावे लागू नये म्हणून, 74 व्या घटना दुरुस्ती मधील आर्टीकल 243 (W) (a) मधील तरतुदी नुसार, राज्य शासनाने महानगरपालिकेस ख-या अर्थाने स्थानिक स्वराज्य संस्था होणेकरीता, आवश्यक ते सर्व अधिकार प्रदान करण्याचे घटनात्मक तरतुद करण्यात आली आहे. राज्य शासनाने नवी मुंबई महानगरपालिकेला घटनात्मक कर्तव्य पार पाडणेकरीता, नियोजन प्राधिकरणाचे अधिकार दि.15/12/1994 रोजीच्या अधिसुचने नुसार, प्रदान केलेले आहे. सबब, नवी मुंबई महानगरपालिका ही या शहराची “नियोजन करणारे प्राधिकरण” असल्यामुळे “महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966” मधील कलम 2 नुसार, सार्वजनिक प्रयोजनाकरीता सिडको, एम.आय.डी.सी. या विशेष नियोजन प्राधिकरणानी त्याच्या विकास आराखडयामध्ये आरक्षीत केलेल्या भुखंडाची मालकी भाडेकरार मुक्त तत्वावर (Free Hold) नवी मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करावी. सदरच्या मालमत्ता “महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 76(4)” मधील तरतुदी नुसार, नवी मुंबई महानगरपालकेमध्ये राज्यशासनाने निहीत कराव्यात, तसेच यापुर्वीचा महापालिका सर्वसाधारण सभेचा मंजूर ठराव क्र.609 दिनांक 30/06/2014 नुसार नमूद भुखंडाबाबत राज्य शासनाने निर्णय घेऊन लवकरात - लवकर शासन निर्णय पारित करावा. भविष्यात नागरी सुविधांचे भुखंड/मिळकती महानगरपालिकेच्या वतीने संबंधीत प्राधिकरणाकडून हस्तांतरीत करुन घेणेकरीता “महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 77 ”नुसार आयुक्त यांना अधिकार प्रदान करुन प्रस्तावित केल्याप्रमाणे ही महापालिका सर्वसाधारण सभा राज्य शासनास विनंती करीत आहे. | 114<br>जानेवारी | 03/03/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 95. | **श्री. सुरज बाळाराम पाटील, यांजकडून :-** नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाच्या माध्यमातून कनिष्ठ महाविद्‌यालय सुरु करणे. | 115 जानेवारी | 990 03/03/2016 | मंजूर |
| 96. | **श्री. सुरज बाळाराम पाटील, यांजकडून :-** नवी मुंबई महानगरपालिका दिघा, ऐरोली, कोपरखैरणे, वाशी, सानपाडा, नेरुळ, सी.बी.डी. येथे मुख्य ठिकाणी एलईडी स्क्रीन उभारुन त्यादवारे आपल्या शहरातील उल्लेखनिय बाबी व इतर सुचना वेळोवेळी नागरिकांपर्यत पोहचविण्याकरिता त्याचा वापर करणे. | 116 जानेवारी | 991 03/03/2016 | मंजूर |
| 97. | **सौ. सुजाता सुरज पाटील, यांजकडून :-** नवी मुंबई महानगरपालिका शाळा कुकशेत गांव संरक्षण भिंतीची दुरावस्था झालेल्याची सुधारणा करणे. | 117 जानेवारी | 992 03/03/2016 | मंजूर |
| 98. | **सौ. सुजाता सुरज पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 85, कुकशेत गांव, गावदेवी मैदानातील जॉगिंग ट्रॅक येथे तुटलेली झाकणे व खराब झालेल्या लाद्‌या यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. सदर जॉगिंग ट्रॅकची दुरुस्ती करणे. | 118 जानेवारी | 993 03/03/2016 | मंजूर |
| 99. | **सौ. सुजाता सुरज पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 85, सारसोळे व सेक्टर-6 परिसरात गटारांवर कित्येक ठिकाणी तुटलेली झाकणे व इत्यादींमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. तरी सदर ठिकाणी नवीन झाकणे बसवून गैरसोय दुर करणे. | 119 जानेवारी | 994 03/03/2016 | मंजूर |
| 100. | **सौ. जयश्री एकनाथ ठाकूर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 86, नेरुळ, सारसोळे गांव व से.-6 येथे कित्येक गटारांवर झाकणे नाहीत. तसेच कित्येक ठिकाणी गटारांवरची झाकणे तुटलेली उवस्थेत आहेत. सदर ठिकाणी नवीन झाकणे बसविणे. | 120 जानेवारी | 995 03/03/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 101. | **सौ. जयश्री एकनाथ ठाकूर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 86, नवी मुंबई महानगरपालिका शाळा सारसोळे गांव, येथील मैदानाची दुरावस्था झालेल्याची सुधारणा करणे. | 121 / जानेवारी | 996 / 03/03/2016 | मंजूर |
| 102. | **सौ. जयश्री एकनाथ ठाकूर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 86, सारसोळे, से-6 येथील जयदुर्गामाता माजी मंडई समोरील मैदानाची सुधारणा करणे. | 122 / जानेवारी | 997 / 03/03/2016 | मंजूर |

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव,**
**नवी मुंबई महानगरपालिका.**